# घटक ४ (ब) बातमीलेखन

अनुक्रमणिका

**४.० उद्दिष्टे**

**४.१ प्रास्ताविक**

**४.२ शब्दार्थ, वाक्प्रचार आणि पारिभाषिक शब्दार्थ**

**४.३ अध्ययन–एका बातमीचे**

४.३.१ बातमीचा नमुना
४.३.२ बातमीचे महत्त्व
४.३.३ बातमी तयार करण्यासाठी वार्ताहराला कोणती पूर्व तयारी करावी लागते?
४.३.४ बातम्यांचे वर्गीकरण
४.३.५ वृत्तपत्रांकडे बातम्या कोठून येतात?
४.३.६ बातम्यांच्या चार नमुन्यांचे अध्ययन
४.३.७ बातमीलेखन करताना कोणत्या बाबी विचारात घ्याल?

**४.४ नमुना उत्तरे**

**४.५ विविध दृष्टिकोनांतून अध्ययन**

४.५.१ 'आकाशवाणी'साठी बातमी लेखन
४.५.२ 'दूरदर्शन'साठी बातमी लेखन

**४.६ सरावासाठी स्वाध्याय**

## ४.० उद्दिष्टे

बातमीलेखन हे देखील प्रगत भाषिककौशल्य आहे. वर्तमानपत्र या शब्दाचा पर्यायी शब्द इंग्रजीत आहे, तो म्हणजे NEWS. हा कसा झाला? North, East, West and South अशा चार दिशांसाठी वापरलेल्या इंग्रजी शब्दांची आद्याक्षरे एकत्र करून तयार झाला.
वर्तमान म्हणजे बातमी
म्हणून प्रस्तुत घटकाचे अध्ययन केल्यानंतर तुम्हाला

- बातम्यांचे महत्त्व काय ते स्पष्ट करता येईल
- बातमीलेखनासाठी कोणती पूर्वतयारी करावी लागते ते तुम्ही सहज सांगू शकाल
- बातमीलेखन कौशल्याची वैशिष्ट्ये तुम्ही स्पष्ट करू शकाल
- बातमीलेखनाचे वेगवेगळ्या नमुन्यांचा परिचय होईल
- वर्तमानपत्रासाठी तुम्हाला प्रभावी भाषेत बातमीलेखन करता येईल.

## ४.१ प्रास्ताविक

१. आपण वर्तमानपत्रे का वाचतो? एकतर जगाच्या कानाकोपऱ्यांतून आलेल्या बातम्या कळाव्यात, तसेच वर्तमानपत्रांतून विविध विषयांवर जी विविध मते, प्रतिक्रिया मांडल्या जातात, त्यांचे यथायोग्य ज्ञान व्हावे म्हणून.

२. बातमी म्हणजे एखादी घटना लोकांना कळावी म्हणून तयार केलेला मजकूर. दररोज जगाच्या कानाकोपऱ्यात अनेक घटना घडतात. त्या सर्वांना 'बातमी'ची पदवी देता येणार नाही. एका लेखकाने म्हटले आहे की कुत्रा माणसाला चावला ही बातमी होऊ शकत नाही; पण माणूस कुत्र्याला चावला ही घटना मात्र बातमी होऊ शकते. म्हणजे घटना जनतेच्या दृष्टीने 'अर्थपूर्ण' असली पाहिजे. बातमी मिळवणे ही जशी अवघड कला आहे तशी ती प्रभावी शब्दांत लिहिणे ही सुद्धा कठीण कला आहे.

३. चांगले बातमीलेखन करण्यासाठी कल्पकता, भाषाप्रभुत्व, सामाजिक दृष्टी, मांडणीचे कौशल्य इत्यादी विविध गुणांची आवश्यकता असते.

## ४.२ शब्दार्थ, वाक्प्रचार आणि पारिभाषिक शब्दार्थ

शांततापथक–शांतता प्रस्थापित करण्यासाठी पाठविण्यात आलेली खास तुकडी
कारवाई करणे–आक्रमक लढाई करणे
प्रवक्ता–योग्य माहिती देऊ शकणारी जबाबदार व्यक्ती
अटक करणे–पकडणे
मूल्यांकन समिती–वस्तूची किंमत ठरविणारी समिती
कोटेशन्स–दरपत्रक
मिल–गिरणी
हस्तक्षेप करणे– दुसऱ्याच्या कामात ढवळाढवळ करणे
तटस्थ–कोणत्याही एका बाजूचा नव्हे तो
सत्तारूढ–ज्यांच्या हातात सत्ता आहे असे
दहशत–खूप भीती
नोटीस–कायदेशीर समज
झळ बसणे–इजा पोचणे, त्रास होणे
अपप्रचार–वाईट प्रचार
डोळ्यात धूळ फेकणे–फसवणे

**पारिभाषिक शब्दार्थ**

लीड–बातमीतील महत्त्वाचा मुद्दा किंवा आशय
वार्ताहर–बातमी देणारा वृत्तपत्राचा प्रतिनिधी
पत्रकार परिषद–माहिती देण्यासाठी वृत्तपत्र प्रतिनिधींची व्यक्तीने किंवा संस्थेने आयोजित केलेली बैठक
हेडलाइन–बातमीला दिलेला मथळा किंवा शीर्षक
प्रेसनोट–वृत्तपत्राला छापण्यासाठी दिलेला अधिकृत मजकूर

## ४.३ अध्ययन–एका बातमीचे

### श्रीलंकेत शांतता पथकावर

# तामिळी बंडखोरांचे हल्ले; २ जवान ठार

**मद्रास, दि. १० (प्रे. ट्र.)— श्रीलंकेतील भारतीय शांतता पथक आणि तामिळ बंडखोर यांच्यात वाढत्या प्रमाणावर चकमकी सुरू झाल्या. भारतीय पथकाच्या तेल्लीपालाई ठाण्यावर आज सायंकाळी बंडखोरांनी गोळीबार केला असता पथकातील २ भारतीय जवान ठार झाले. चौघे जखमी झाले. बंडखोरांनी हल्ल्याच्या वेळी मशीनगनचा वापर केला हे विशेष!**

तामिळ बंडखोरांचे जाफना हे प्रभावी क्षेत्र समजले जाते. जाफना पासून अवघ्या तीन कि. मी. अंतरावर तेल्लीपालाई ठाणे आहे. सायंकाळी पाचच्या सुमारास बंडखोरांनी हल्ला केला. नंतर मात्र गोळीबाराचा मारा अधिक तीव्र झाला.

संरक्षण मंत्रालयाच्या प्रसिद्धी-पत्रकात ही माहिती देताना सांगण्यात आले की, तामिळ टायगर्सचा डेप्युटी कमांडर महात्तय्या याच्या निदर्शनाखाली हे हल्ले झाले.

**लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ इलम संघटनेमार्फत श्रीलंकेतील जाफना येथे बेकायदेशीररीत्या चालविली जाणारी चित्रवाणी आणि रेडिओ केन्द्र, भारतीय शांतता रक्षक पथकाने आज पहाटे कारवाई करून ताब्यात घेतले.**

कारवाईच्या संदर्भात माहिती देताना परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या प्रवक्त्याने सांगितले की, भारत आणि श्रीलंका यांच्यात झालेल्या शांतता कराराच्या विरुद्ध चित्रवाणी आणि रेडिओ केंद्राच्या प्रक्षेपकाद्वारे प्रचार करण्यात येत होता.

वांशिक दंगलींना चिथावणी देणारे साहित्य प्रसिद्ध करणारा एक छापखानाही भारतीय शांतता रक्षक पथकाने ताब्यात घेतला. तामिळ बंडखोरांचा विशेष प्रभाव असलेल्या जाफना भागातच हा छापखाना चालविला जात होता, असे आज अधिकृतरीत्या सांगण्यात आले.

भारतीय शांतता रक्षक पथकाने आज सायंकाळपर्यंत आणखी २० तामिळ बंडखोरांना अटक केली. दरम्यान, भारतीय शांतता रक्षक पथक आणि श्रीलंका लष्कर यांच्या संयुक्त कारवाईत वादामाराच्छी, अवरांकल, अच्छुवेली, वाल्लाईपुत्तूर आणि निरावेल्ली येथून जवळजवळ १०० बंडखोरांना ताब्यात घेण्यात आले. लिबरेशन टायगर संघटनेचा प्रमुख कार्यकर्ता मुकुंदन यास पालाई येथे अटक करण्यात आली.

#### सिंहली नागरिक ठार

**कोलंबो–**श्रीलंकेतील वेगवेगळ्या बंडखोरांच्या गटात चकमक होऊन ९ सिंहली नागरिक ठार झाले असे श्रीलंका अधिकाऱ्यांनी आज येथे सांगितले. तामिळ वांशिक अल्पसंख्याक आणि बंडखोर यांच्यात ही चकमक झाली. भारतीय शांतता रक्षक पथकाने आजच्या दिवसभराच्या कारवाईत पूर्व श्रीलंकेतील बंडखोरांच्या शस्त्रांचे साठे ताब्यात घेतले.

भारत–श्रीलंका शांतता कराराला विरोध करणाऱ्या हिंसक प्रवृत्ती-विरुद्ध कारवाई सुरळीत करता यावी म्हणून श्रीलंकेच्या उत्तर आणि पूर्व भागात भारतीय शांतता रक्षक पथकाने दोन मुख्यालयांची स्थापना केली आहे, असे विश्वसनीय गोटातून समजले.

#### पंत परतले

भारत-श्रीलंका कराराच्या अंमल-बजावणी संदर्भात श्रीलंकेचे अध्यक्ष जयवर्धने यांच्यासमवेत चर्चा आटोपून संरक्षणमंत्री कृष्णचंद्र पंत आज नवी दिल्लीत परतले. पंतप्रधान राजीव गांधी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या मंत्रीमंडळाच्या राजकीय व्यवहार समितीच्या बैठकीत श्री. पंत यांनी जयवर्धने यांच्यासमवेत झालेल्या चर्चेचा तपशील सांगितला. श्री. पंत यांच्याबरोबर सेनाप्रमुख जनरल के. सुंदरजी हेही परतले आहेत.

ही बातमी वाचून तुमच्या लक्षात कोणकोणत्या गोष्टी आल्या?

- बातमीचा मथळा वाचकांचे लक्ष वेधून घेतो.
- बंडखोरांच्या कृत्याबद्दल चीड येते.
- बातमी थोडक्या शब्दांत दिली आहे.
- वस्तुनिष्ठता आहे.

## ४.३.२ बातमी चे महत्व

वर्तमानपत्राला लोकशाही राज्यव्यवस्थेत चौथी संपत्ती असे म्हणतात. वर्तमानपत्र हे जनजागृतीचे प्रभावी माध्यम आहे. वर्तमानपत्र जनमत प्रक्षुब्ध करू शकते; जनमताला इष्ट वा अनिष्ट वळण लावू शकते; जनतेचे प्रबोधन करते. जनतेवर होणारा अन्याय किंवा त्यांची गाऱ्हाणी वेशीवर टांगते. सरकारच्या धोरणांवर व कृतींवर सतत लक्ष आणि अंकुशही ठेवते. वर्तमानपत्रात अग्रलेख, लेख, विविध सदरे, जाहिराती इत्यादी मजकुरांबरोबर 'बातम्यां'ना अधिक जागा असते. देशोदेशीच्या घटना, महत्त्वपूर्ण प्रसंग, धोरणे इत्यादींची माहिती बातम्यांच्या द्वारे होत असते.

### ४.३.३ बातमी तयार करण्यासाठी वार्ताहराला कोणती पूर्वतयारी करावी लागते?

वर्तमानपत्रातील बातमी एखादी घटना घडल्यापासून ती वाचकाच्या हातात पडेपर्यंत विशिष्ट प्रक्रियेतून जात असते.

- एखादी घटना घडते, तेव्हा वार्ताहर माहिती गोळा करतो
- गोळा केलेली माहिती वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून मांडण्याचा प्रयत्न वार्ताहर करतो
- मग त्या बातमीचे लेखन करतो. बातमीची भाषा सर्वसामान्य वाचकाला समजेल अशी असते
- बातमीचा मुख्य आशय किंवा गाभा वाचकांना कळावा म्हणून कमीत कमी शब्दांत तो लीड देतो व योग्य मथळा देतो.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(अ) बातमीचा 'मथळा' प्रभावी आहे. पण ४·३·१ मधील बातमीचा 'लीड' कोणता?

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

(ब) वर्तमानपत्राची **तीन** प्रमुख कार्ये कोणती?

१. ................................................................................

२. ................................................................................

३. ................................................................................

(क) **जागा भरा**

१. वर्तमानपत्रांना .................. असे म्हणतात.

२. बातमीलेखन .................. केले पाहिजे.

३. ........... असल्याशिवाय वाचकांचे लक्ष वेधले जात नाही.

### ४.३.४ बातम्यांचे वर्गीकरण

वर्तमानपत्रात विविध बातम्या येत असतात. त्यांचे वर्गीकरण विविध प्रकारे करता येते. काही प्रमुख प्रकार असे–

(१) परराष्ट्रीय
(२) राज्यातील
(३) शासकीय धोरण
(४) जिल्ह्यातील/स्थानिक घटना
(५) विशिष्ट क्षेत्रातील (चित्रपट, दूरदर्शन, संगीत, क्रीडा, व्यापार-उद्योग, शिक्षण इत्यादी)
(६) राजकीय घटना

### ४.३.५ वृत्तपत्रांकडे बातम्या कोठून येतात

- वार्ताहर (स्थानिक/राज्यपातळीवर/देश/परदेश)
- विशेष प्रतिनिधी
- शासकीय/निमशासकीय/खासगी संस्थांची जनसंपर्क कार्यालये
- विविध वृत्तसंस्था (प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया, युनायटेड प्रेस, असोसिएटेड प्रेस इत्यादी)
- आकाशवाणी
- दूरदर्शन
- दूर मुद्रणसेवा

### ४.३.६ बातम्यांच्या चार नमुन्यांचे अध्ययन

आता खाली दिलेल्या क्र. २, ३, ४ व ५ या बातम्या वाचा आणि त्यांचे अध्ययन खालील मुद्द्यांच्या आधारे करा.

१) मथळा
२) लीड
३) आशयाची मांडणी
४) बातमीची भाषा
५) बातमीचा प्रकार
६) बातमीलेखकाचा दृष्टिकोन
७) बातमीलेखकाचे गुण

## थकबाकी मिळण्यासाठी
# ऊस उत्पादकांचा उपोषणाचा पवित्रा

**श्रीरामपूर, दि. १० (लो. वा.) – महाराष्ट्र शुगर मिल्स टिळकनगर या श्रीरामपूरजवळील साखर कारखान्यास आठ हजारावर ऊस पुरविणाऱ्या शेतकऱ्यांपैकी पाचशेएक शेतकरी येथील साखर संचालकांच्या कचेरीपुढे बेमुदत आमरण उपोषण करणार असल्याच्या आशयाची नोटीस साखर संचालकांना महाराष्ट्र साखर कारखाना ऊस पुरवठा शेतकरी संघ या संघटनेने बजावली आहे.**

ऊसाअभावी सदरचा कारखाना कायमचाच बंद करून कारखान्याची यंत्रसामुग्री राज्यातील अन्य होऊ घातलेल्या सहकारी साखर कारखान्यांना विकण्यास आम्हास परवानगी द्यावी असे कारखान्याच्या संचालकांनी राज्याचे सहकार व महसूलमंत्री श्री. विलासराव देशमुख यांना कळविले आहे. त्यानुसार शासनाने मशीनरीची किंमत ठरविण्यासाठी साखर संचालकांचे अध्यक्षतेखाली मूल्यांकन समिती नियुक्त केली असून दोन महिन्याचे आत अहवाल देण्यास सांगितले आहे. समितीची नेमणूक होऊन महिना लोटला तरी अद्याप काही एक काम झालेले नाही. आठ हजारावर शेतकऱ्यांचे १९८५-८६ आणि १९८६-८७ या दोन गळीत हंगामातील उसाचे किंमतीचे सुमारे एक कोटी रुपये महाराष्ट्र शुगर मिल्सकडून येणे आहे. कारखाना विक्रीचा व्यवहार होताच हे देणे आम्ही ताबडतोब देतो असे या कारखान्याच्या चालकांनी आंदोलक शेतकऱ्यांना आश्वासन दिले आहे मशिनरी विकत घेण्याच्या किंमतीचे कोटेशन्सही संबंधितांनी महाराष्ट्र मिल्सकडे दिली आहेत. केवळ मूल्यांकन कमिटीच्या दिरंगाईमुळे शेतकऱ्यांना त्यांचे ऊसाचे पैसे मिळत नाहीत. दिवाळीचे आत आमचे पैसे आम्हाला मिळाले नाहीत तर आम्ही उपोषणास बसू असा शेतकऱ्यांचा निर्धार आहे. या प्रश्नात तातडीने लक्ष घालण्याची मागणी सदर ऊस पुरवठा

बातमी क्र.३

# अमेरिकेचा तिबेटमध्ये हस्तक्षेप : चीनची टीका

**बिजिंग, दि. १० (प्रे. ट्र.) — अमेरिका तिबेटमध्ये हस्तक्षेप करीत असून १५ परदेशी वार्ताहरांना तिबेट सोडून जाण्यासंबंधी दिलेल्या आदेशावर अमेरिका बेजाबदार वक्तव्ये करीत आहे, असा आरोप चीनच्या परराष्ट्र खात्याने केला आहे.**

हे वार्ताहर तिबेटमधील वृत्त मिळविण्यासाठी योग्य प्रथेनुसार जात नव्हते, त्यामुळे त्यांची हकालपट्टी करण्यात आली. त्याचा अर्थ माहिती मिळविण्याच्या मुक्त पद्धतीवर निर्बंध घालणे असा होत नाही आणि या संदर्भात कोणत्याही परकीय राष्ट्रास बेजबाबदारपणे वक्तव्य करता येणार नाही, असे परराष्ट्र खात्याच्या प्रवक्त्याने म्हटले आहे.

**भारत तटस्थ**

चीन-अमेरिका यांच्यात आरोप-प्रत्यारोप चालू असतानाच भारताने मात्र, ल्हासा येथील दंगल ही चीनची अंतर्गत बाब आहे, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. तसेच भारतीय भूमीवरून कोणत्याही प्रकारच्या राजकीय हालचाली करण्यात येऊ नयेत अशी सूचना भारताने दलाई लामा यांना केली आहे.

भारत-चीन सीमा प्रश्नासंबंधी पुढील महिन्यात उभय देशात नवी दिल्ली येथे चर्चा होणार आहे, यामुळे तिबेट प्रकरणी भारताने तटस्थ भूमिका स्वीकारली असल्याचे समजते

बातमी क्रमांक ४

## चप्पल उगारली

(विशेष प्रतिनिधी)

**मुंबई, शनिवार—कराडनजिकच्या कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या गैरकारभाराची चौकशी सुरू होताच सत्तारूढ संचालक मंडळातील अनेकांचे धाबे दणाणले आहे. काही संचालकांनी दहशतीच्या मार्गाचा अवलंब केला असून चौकशी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दबावाचा 'अजब' प्रकार काल कारखाना परिसरात घडला.**

कृष्ण सहकारीच्या गैरकारभारात उपसा जलसिचनचे पाणी वाटप हे एक प्रकरण आहे. तांबवे हद्दीतील एका संचालकाच्या शेतावर उपसा योजनेचे पाणी सर्व नियम मोडून लाभ क्षेत्राच्या बाहेर दिले गेले. त्यांच्या शेतावरील पाईपलाइनचा ३० हजार रुपये खर्च कारखान्याने द्यावा असा ठराव आठ दिवसापूर्वी संचालकांनी मंजूर करून घेतला. सदर पाईपलाईनचे पैसे त्वरित मिळावेत म्हणून संबंधित संचालकांच्या चिरंजीवाने कारखान्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याशी हुज्जत घातली आणि चौकशी मंडळापुढे त्या अधिकाऱ्यावर चप्पल उगारली. दहशतीचे प्रकार कोणत्या थराला गेले ते चौकशी अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष पहायला मिळाले.

**संचालक राजीनाम्याच्या तयारीत**

चौकशी सुरू होताच कृष्णा सहकारीच्या काही संचालकांनी राजीनामे देण्याची तयारी दर्शविल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. मात्र उर्वरित संचालक कारखान्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यावर दबाव आणीत असल्याचे वाढते प्रकार निदर्शनास येत आहेत. तीन चौकशी अधिकारी गेले चार दिवस पोलीस संरक्षणासह कारखान्यावर चौकशी करीत आहेत.

बातमी क्रमांक ५

# बागायती कराची झळ सामान्य शेतकऱ्यांना नाही

**भाई सावंत**

(आमच्या वार्ताहराकडून)

मालवण, दि. १०—शासनाने ज्यांचे आंबा बागायतीपासून सर्व खर्च वजा जाता छत्तीस हजार रुपये उत्पन्न आहे अशाच बागायतदारांकडून बागायत कर वसूल करण्याचे ठरविले असून त्यामुळे शासनाच्या महसूलात वाढ होणार असली तरी या कराचा सामान्य शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही, असे प्रतिपादन ग्रामविकास मंत्री श्री. भाई सावंत यांनी येथील आरसे महालात 'लोकसत्तेशी' बोलताना केली.

संबंधित अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना बागायती कराच्या संदर्भात काढलेल्या नोटिसांबाबत विचारता श्री. सावंत म्हणाले की, बागायती उत्पन्नावर कर घेण्याचा निर्णय पूर्वीच घेण्यात आला आहे. आता त्याची अंमलबजावणी होत आहे. काही अधिकाऱ्यांनी या नियमांचा चुकीचा अर्थ लावून लहान गरीब शेतकरी-बागायतदारांना नोटिसा पाठविल्या आहेत. परंतु शेतकऱ्यांनी त्या नोटिसांना घाबरून जाण्याचे कारण नाही. त्या नोटिसा मागे घेण्यात येतील. या संदर्भात कृषी विद्यापीठाचा जो अहवाल आहे तो ग्राह्य धरण्यात येईल. कलम बागायतदारांकडून त्यांचा जागेवरील तसेच विक्रीपर्यंतचा सर्व खर्च वजा जाता जर ३६ हजार रुपयांहून अधिक नफा असेल तरच हा कर वसूल करण्यात येईल.

ह्या करवसूलीची कोणतीही झळ गरीब शेतकऱ्यांना बसणार नाही असे स्पष्ट करताना श्री. सावंत म्हणाले, निवडणुका जाहीर होण्याअगोदरच विरोधी पक्ष सरकारच्या योजनेला भ्रष्ट ठरवीत असून त्याबाबत अपप्रचार करून लोकांच्या डोळयांत धूळ फेकीत आहेत.

### ४.३.७ बातमीलेखन करताना कोणत्या बाबी विचारात घ्याल?

४.३.६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या मुद्द्यांच्या आधारे बातमी क्र. २ ते ५ यांचे अध्ययन केल्यानंतर तुमच्या लक्षात आले असेल की वाचकांची आस्था (interest), त्यांच्या गरजा, विषयाचे प्रचलित महत्त्व आणि वाचकांची ग्रहणशक्ती विचारात घेऊन या बातम्यांचे लेखन केलेले आहे.

आता बातमीलेखन करताना खालील बाबी लक्षात घ्या.

१. सर्वांत महत्त्वाची घटना प्रथम सांगून नंतर स्पष्टीकरण किंवा तपशील दिला आहे.
   बातमी क्र. १, २ व ४ याकडे लक्ष द्या
२. मथळा असा असावा की वाचकाचे चित्त वेधावे
   बातमी क्र. ४ बघा.
३. बातमीत स्थल, काल, व्यक्ती यांचे उल्लेख नीट करावेत
४. बातमी वस्तुनिष्ठ असावी. घटनेचे वृत्त घडले तसे द्यावे
५. बातमी वाचल्यावर संपूर्ण घटना वाचकांसमोर साक्षात उभी राहावी
६. बातमी सर्वांना सहज समजावी
७. नेमक्या, सुबोध आणि अर्थपूर्ण शब्दांचा वापर करावा
८. लेखनविषयक नियम पाळावेत
९. बातमीत बदनामीकारक मजकूर नसावा
१०. बातमी लिहिण्यापूर्वी सत्यासत्यता पडताळून पाहावी
११. बातम्यांची मांडणी आकर्षकरीतीने करावी
१२. बातमीचे लेखन करताना सहा 'क' कार महत्वाचे. कुठे? केव्हा? कोणी? कशासाठी?, कोणाला?, कसे? या 'क' कारांची उत्तरे बातमीत मिळावीत.
१३. बातमीत कायद्याचे उल्लंघन होऊ नये
१४. बातमी अधिकृतसूत्राकडून मिळवावी
१५. बातमी देणाऱ्याने पूर्वग्रहदूषित दृष्टीने घटनेकडे पाहू नये
१६. बातमीला भाषाशैलीचे सौंदर्य लाभावे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(ड) बातम्या क्र. १ ते ५ वाचा. त्यांचे वर्गीकरण करा

बातमी क्र. १

बातमी क्र. २

बातमी क्र. ३

बातमी क्र. ४

बातमी क्र. ५

(इ) वृत्तपत्राकडे बातम्या कोठून येतात? (तीन यंत्रणा)
त्याचा उल्लेख कोणत्या क्रमांकाच्या बातम्यात आहे?

१ २ ३

| यंत्रणेचे नाव | बातमी क्रमांक |
|---|---|
| १ | |
| २ | |
| ३ | |

(फ) वरील बातम्यात वाक्प्रचार आले आहेत त्यातले तीन शोधा आणि त्यांचा वाक्यात उपयोग करून दाखवा (त्यामाठी जागा सोडली आहेस.)

१. वाक्प्रचार ..............................................................

वाक्य ..............................................................

..............................................................

२. वाक्प्रचार ..............................................................

वाक्य ..............................................................

..............................................................

३. वाक्प्रचार ..........................................

वाक्य ..........................................

..........................................

## ४·४ नमुना उत्तरे

(अ) श्रीलंकेतील भारतीय शांतता पथक आणि तामिळ बंडखोर यांच्यात वाढत्या प्रमाणात चकमकी सुरू झाल्या. पथकातील २ भारतीय जवान ठार झाले, चौघे जखमी झाले. बंडखोरांनी हल्ल्यांच्या वेळी मशीनगनचा
वापर केला.

(ब) १. लोकमत जागृत करणे
२. लोकमताला वळण लावणे
३. सरकारच्या धोरणांवर व कृतीवर अंकुश ठेवणे.

(क) १–चौथी संपत्ती २–वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून
३–मथळा आकर्षक व उत्कंठावर्धक

(ड) क्र. १–परराष्ट्रीय धोरण
क्र. २–स्थानिक, शेतीक्षेत्र
क्र. ३–परराष्ट्रीय धोरण
क्र. ४–स्थानिक, सहकारीक्षेत्र
क्र. ५–शासकीय धोरण

(इ) १–वृत्तसंस्था २–स्थानिक वार्ताहर ३–राज्यशासन

| यंत्रणेचे नाव | बातमी क्रमांक |
|---|---|
| प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया | १, ३ |
| वार्ताहर–स्थानिक | २, ५ |
| विशेष प्रतिनिधी | ४ |

(फ) **हकालपट्टी करणे**
उदा. कॉंग्रेस पक्षाने बंडखोरांची हकालपट्टी केली.

**डोळ्यात धूळ फेकणे**
उदा. काही स्वार्थी नेते शेतकऱ्यांना खोटी आश्वासने देऊन त्यांच्या डोळ्यात धूळ फेकत आहेत.

**धाबे दणाणणे**
उदा. अचानक तुफान पाऊस कोसळल्यामुळे झोपडपट्टीवासीयांचे धाबे दणाणून गेले.

## ४·५ विविध दृष्टिकोनांतून अध्ययन

बातमीलेखन केवळ वर्तमानपत्रासाठी करावे लागते असे नाही. आकाशवाणी व दूरदर्शन ही आणखी दोन लोक-संपर्क माध्यमे आहेत.

### ४.५.१ 'आकाशवाणी'साठी बातमीलेखन

'आकाशवाणी'चा श्रोता एका श्राव्य व चल माध्यमांशी बांधला आहे. म्हणून आकाशवाणीसाठी बातमीलेखन करताना 'ध्वनी माध्यमा'चे भान ठेवले पाहिजे. आपल्या श्रोत्याचे लक्ष बातमीवर केंद्रीत होईल अशा पध्दतीने लेखन केले पाहिजे.

मथळ्या ऐवजी वृत्त निवेदक अगोदर महत्त्वाच्या बातम्या सांगतो आणि मग त्या त्या वृत्ताच्या महत्त्वानुसार बातम्या निवेदन करतो. तो पल्लेदार वाक्ये योजणार नाही. बोलभाषेचा अवलंब करील. छोटी छोटी वाक्ये योजेल व वाक्यरचना श्रवणसुलभ असेल. असे, तसे, ऐकले इत्यादी लिखित शब्द असं, तसं, ऐकलं अशा बोलीत लिहील. कमीतकमी शब्दांत जास्तीत जास्त आशय मांडावा लागेल.

### ४.५.२ 'दूरदर्शन'साठी बातमीलेखन

'आकाशवाणी' प्रमाणेच 'दूरदर्शन'साठी बातमीलेखन करावे लागते. फरक एवढाच की दूरदर्शनवर 'श्राव्य' अंगाबरोबर 'दृश्य' अंगाचेही भान ठेवावे लागेल. बातमीलेखन आता चित्र-भाषेत करावे लागेल. येथे बातमी निवेदनाबरोबर दृश्यांचा, चित्रांचा, तक्त्यांचा उपयोग करता येईल.

'आपल्या पंतप्रधानांनी वीस कलमी राष्ट्रीय कार्यक्रम राबवण्याचे आवाहन केले आहे' या बातमीचे निवेदन चालू असताना 'पंतप्रधान सभेत बोलत आहेत' हे दृश्य चित्रित करता येईल. त्यामुळे बातमीचा प्रभाव वाढेल.

३. खालील बातमीचा मथळा निराळा द्या, तिची मांडणी वेगळी करा व आशय संक्षेपाने मांडा.
'दूरदर्शन'साठी हीच बातमी कशी लिहाल?

# फुगे पकडताना झालेल्या स्फोटात ४५ मुले जखमी

## चेंबूरनजीकची घटना

**मुंबई, ता. ८ (बातमीदार) : हवेतून उडत आलेले फुगे कुतुहलाने पकडताना झालेल्या स्फोटात दहा ते पंधरा वर्षे वयोगटातील ४५ मुले जखमी झाली. ही दुर्घटना आज दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास चेंबूर नजीकच्या घाटला येथील नागेश पाटीलवाडीत घडली.**

जखमीपैकी २८ जणांना घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यापैकी चौघांची प्रकृती चिंताजनक असल्याचे कळते. या फुग्यात स्फोटक रसायन असल्याचे समजल्यामुळे अपघाताचे गूढ वाढले आहे. पोलिस कसून चौकशी करीत आहेत.

याबाबत अधिक चौकशी करता असे समजते, की घाटला येथील मरुमाउली मंदिरानजीकच्या मैदानात दुपारी अनेक मुले नेहमीप्रमाणे खेळत होती. साडेबारा वाजण्याच्या सुमारास गोवंडीच्या दिशेकडून हवेत असंख्य फुगे येताना दिसले. तेव्हां खेळत असलेली सर्वच मुले त्या फुग्यांकडे कुतुहलाने पाहू लागली. त्यापैकी ५० ते १०० फुगे मैदानाच्या जागेवरच येऊ लागताच ते पकडण्यासाठी मुलांची झुंबड उडाली. या प्रयत्नात फुगे फुटताच झालेला आवाज दिवाळीत एकाच वेळी अनेक ॲटमबाँब फुटतात तसा होता.

या फुग्यांविषयी अधिक माहिती देताना जखमी झालेल्या भरत पाटील याने सांगितले की, फुग्यांच्या खालच्या बाजूस रुपेरी रंगाची एक छोटी पिशवी होती. या फुग्यावर 'कविता-अतुल शुभ-विवाह' असे इंग्रजीत लिहिले होते.

स्फोट इतका मोठा होता की ७० ते ८० फुटावर असलेल्या रस्त्यात असलेली ही काही मुले जखमी झाली.

४. खालील बातमी-पत्रे तयार करा.

अ) किशोरकुमार यांच्या निधनाबद्दलची बातमी
ब) शासनाने मागण्या मान्य केल्या. शिक्षकांनी संप मागे घेतला.
क) पु. ल. देशपांडे यांना कालिदास-पारितोषिक मिळाले.
ड) दुष्काळाने जनता त्रस्त झाली. प्यायला पाणी नाही. रोजगार नाही. महागाई वाढली.
इ) सहकारी कारखाना आजारी आहे. कारखाना बंद आहे त्यामुळे बेकारी, उपासमार, अशांतता आहे.

५. पुष्कळ शब्द बातमीसाठी नेहमी लागतात त्यांपैकी काही दिले आहेत. आणखी शब्द सुचवा.

| | |
|---|---|
| असे समजते | अनावरण समारंभ |
| खात्रीलायक | पारितोषिक वितरण |
| पोलीस तपास | जखमी, ठार |
| आवाहन | सदिच्छा, शुभेच्छा |
| फेटाळले | शिबीर, मेळावा |
| परिषद | संदेश |

| | | |
|---|---|---|
| व्यावहारिक मराठी भाषा | उद्‌घाटन | वाटाघाटी |
| | प्रास्ताविक | आभार प्रदर्शन |
| | मुलाखत | हरताळ, संप, निदर्शने |

## ४·६ सरावासाठी स्वाध्याय

१. खाली कविवर्य कुसुमाग्रजांच्या भाषणाबद्दल बातमी तयार केली आहे. तिला योग्य मथळा द्या.

**श्रीरामपूर, दि. १०** स्वातंत्र्योत्तर काळात समाजातील सर्व शक्ती राजकारणासाठी खर्च होत आहे. त्यामुळे कार्यकर्ता नावाची संस्थाच नष्ट होत आहे. सत्ता, संपत्ती आणि स्वार्थ म्हणजे आजचे राजकारण हे समीकरण झाले आहे, पण हा स्वार्थ परमार्थाला भिडला पाहिजे, अंधांसाठी हाती घेण्यात येणारे कार्य हे देवकार्य आहे असे मानले पाहिजे, असे प्रतिपादन कविवर्य तात्यासाहेब शिरवाडकर यांनी केले.

नॅशनल असोसिएशन ऑफ ब्लाइंड या संस्थेच्या अहमदनगर जिल्हा शाखेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

महाराष्ट्रात साडेआठ लाख अंध आहेत, असे यावेळी सांगण्यात आले.

२. खाली दिलेली बातमी वाचा. ती वाचून बातमीलेखनाचे कोणते विशेष लक्षात आले ते सांगा. हीच बातमी आकाशवाणीसाठी कशी लिहाल?

# सेनेने दक्ष राहावे

### १४. राष्ट्रपतींचे आवाहन

**गंगटोक, ता. ८ (पीटीआय, यूएनआय) : "शेजारी राष्ट्रांशी असलेले प्रश्न शांततापूर्ण वाटाघाटींद्वारे सोडविण्यास भारत वचनबद्ध आहे. तरीसुद्धा सेनादलांनी सतत अतिशय दक्ष राहावे." असे आवाहन राष्ट्रपती आर. वेंकटरमण यांनी आज केले. ते येथे सैनिकांपुढे भाषण करीत होते.**

"सर्वांशीच मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याची भारताची इच्छा आहे. आम्ही विस्तारवादी नाही. दुसऱ्याचा प्रदेश घेण्याची आमची इच्छा नाही. तथापि दुसऱ्या बाजूकडून हे मैत्रीसंकेत पाळले न जाण्याचीही शक्यता आहे, हे लक्षात घेऊन आपण दक्षतेच्या बाबतीत शैथिल्य आणता कामा नये" असे प्रतिपादन राष्ट्रपतींनी केले. "आपले जवान जगात सर्वश्रेष्ठ आहेत" असा त्यांनी गौरव केला.

पंधरा तिबेटी नागरिकांचे शिष्टमंडळ राष्ट्रपतींना आज येथे भेटले. 'दलाई लामांच्या सरकारला' भारताने मान्यता द्यावी असे आवाहन त्यांनी पाच हजार तिबेटी निर्वासितांतर्फे केले. (दलाई लामा यांना तिबेटमधून हद्दपार करण्यात आले आहे.)